म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चा. वा.
दा. क्र. २५०३

# बुकरटी वॉशिंग्टन

IRBK-0102503
IRBK-0102503

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
नं.

म. ग्रं.
विषय
ना. नं.



दा० क्र० २५०३

किशोर—साहित्य–२७

म. ग्रं. सं. ठाणे.
[illegible]

म. ग्रं. सं. ठाणे, सार्वजनिक वाचनालय
दा. क्र....२५०३ नोंदि. दि..........
वि. ...[illegible]... क्र...........

# बुकर टी वाशींग्टन

लेखक

दीनानाथ म्हात्रे

IRBK-0102503

IRBK-0102503

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

# माझ्या बाल वाचकांस

किमत ५ आण.

प्रथमावृत्ति १९४६—सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रकाशक—शंकर वामन कुलकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४.

मुद्रक—मधुकर रघुनाथ कालेवार, प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस, नानाशंकरशेट वाडी, ३८० ठाकुरद्वार, मुंबई २

म. ग्रं. सं. ठाणे.
२०·३·१९८८
2403

# बुकर टी. वाशिंग्टन

## ( १ )

माझं नांव बुकर टी. वाशिंग्टन.

व्हर्जीनिया गावांत माझा जन्म झाला. माझी आई गुलाम म्हणून कापसाच्या व इतर शेतांवर काम करी. अर्थात् मी पण जन्मतांच गुलाम होतों. आफ्रिकेहून त्या वेळीं निग्रो लोकांना बोटींत घालून अमेरिकला आणीत. कापसाच्या व इतर शेतांत हे काळे लोक काम करीत. तुम्हांला नवल वाटेल, पण मला माझ्या वडिलांचं नांव माहित नाहीं. कारण गाई किंवा मेंढ्या विकत आणाव्या तसेच इतर निग्रो लोकांबरोबर माझ्या आईला आफ्रिकेहून अमेरिकेला आणलं होतं. अर्थात् ज्या गोऱ्या माणसानं तिला आणलं होतं त्याचाच तिच्यावर ताबा होता. आमचीं घरं मोडकळीस आलेलीं आणि फार लहान होतीं. माझ्या जीवनाची सुरुवात अशा तऱ्हेनें झाली. माझी आई शेतावरच्या लोकांकरितां जेवण करीत असे. त्यामुळं आमचं घर म्हणजे स्वयंपाकाची खोलीच झाली होती. आधींच लहान घर, त्यांत ही गडबड. शिवाय घराला खिडक्याही नव्हत्या. भिंतीला लहान लहान भोंकं होतीं त्यांतून उजेड यायचा आणि थंडीच्या दिवसांत गार

वाराही. आमच्या घराला दार एकच होतं. तें पण केव्हां कोसळेल त्याचा नेम नव्हता. माझ्या आईचा सारा वेळ जेवणाच्या गडबडींत जायचा. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आई कामावर जुंपलेला असायची. त्यामुळें आमच्याकडे लक्ष द्यायला तिला वेळच मिळत नस. सकाळीं काम करायला सुरुवात करण्यापूर्वी, जो थोडासा वेळ मिळे तेवढाच. केव्हां केव्हां आमची आई रात्रीं आम्हाला गाढ झोपेंतून उठवी, आणि कोंबडीच्या पिलांचं मटन खायला देई. हीं कोंबडीचीं पिलं आमच्या मालकाच्या शेतांतून ती चोरून आणीत असे. पण त्याबद्दल माझ्या आईला मी अप्रामाणिक कधींच म्हणणार नाहीं. तो तिचा दोष मुळींच नव्हता. आम्हां गुलामांना फार हालांत व दुःखांत दिवस काढावे लागत. गुलामगिरी पद्धतीचा हा दोष होता.

## ( २ )

मला एक भाऊ आणि एक बहीण होती. बहिणीचं नांव ॲमेंडा आणि भावाचं नांव जॉन होतं. झोंपायला आम्हाला कधीं मऊ मऊ बिछाना मिळाला नाहीं. फाटक्या मळकट कपड्यांवर मी माझी बहीण व भाऊ झोंपत असूं. तुम्ही आतां किती तरी खेळ खेळतां! पण खेळ म्हणजे काय तें मला ठाऊकच नव्हतं. माझा सबंध दिवस कसलं तरी काम करण्यांत जायचा.

आंगण झाडण्याचं, शेतांत काम करणाऱ्या लोकांना जेवण न्यायचं, आणि गिरणींतून धान्य दळून आणायचं, असलीं कामं

मी करीत असें. आमच्या घरापासून गिरण तीन चार मैलांवर होती. धान्याचं पोतं घोड्याच्या पाठीवर लादून आमची स्वारी गिरणीकडे निघायची. पण अर्ध्या वाटेंत घोड्याच्या पाठीवरचं पोतं सैल होऊन खालीं पडायचं. मी लहान असल्यामुळं एव्हढं मोठं जड पोतं परत घोड्याच्या पाठीवर ठेवणं मला जमत नसे आणि मी रडत, तासन् तास कोणा तरी वाटसरूची वाट पाहत बसायचा. असं रडत बसण्यांत नेहमींच माझा बराच वेळ फुकट जाई व गिरणींत धान्य दळून परत यतांना रात्र होई. रस्ता लांबचा व अरण्यांतून होता. माझ्या छातींत भीतीनें धडधड होई. कारण लोक सांगत कीं सैन्यामधले लोक पळून रानांत आले आहेत. त्यांना निग्रो मुलगा दिसला कीं ते त्याचे कान कापतात ही एक भीती व वेळ झाला कीं आई रागावे आणि कधीं कधीं धम्मक लाडू मिळत ते निराळेच.

गुलाम असेपर्यंत मी शाळेंत कधींच गेलों नाहीं. केव्हां तरी आमच्या मालकाच्या मुलीला मी शाळत घेऊन जाई. वर्गांत बरींचशीं मुलं अभ्यास करीत असत. तें पाहून माझ्या मनाला फार वाईट वाटे. मनांत विचार येई—“ अरेरे—मी शाळेंत असतों तर ! ” ती कल्पना मनांत येतांच माझं मन आनंदानें नाचूं लागे.

## ( ३ )

एक दिवस सकाळीं मला असं कळलं कीं आमची गुलामगि-रितून सुटका होणार. माझी आई नेहमीं देवाजवळ प्रार्थना

करायची कीं आमची गुलामगिरींतून लवकर सुटका होवो. माझ्या बालमनाला त्या वेळीं आश्चर्य वाटलं कीं ह्या गुलामांना लिहितां वाचतां येत नाहीं. मग आम्हाला स्वातंत्र्य मिळणार हें ह्यांना कळलं कसं ? पण पुढें मी पाहिलं तों रात्रीं गूपचूप जमून माझी आई आणि इतर गुलाम गोष्टी करीत बसत. अमेरिकेचे अध्यक्ष लिंकन, गॅरिसन आणि लव्हजॉय ह्या लोकांनीं आमची बाजू घेऊन आम्हाला गुलामगिरींतून मोकळं करण्याचं ठरविलं होतं. लवकरच लढाई सुरू झाली. आम्ही गुलाम लोक मोठ्या आतुरतेनें लढाईच्या निकालाकडे डोळे लावून बसलों होतों. आमच्या गांवच्या-शेतापासून दूरवर टपालकचेरी होती. आठवड्यांतून एकदां पत्रं यायचीं. एक गुलाम कचेरींतून तीं सर्व पत्रं घेऊन येई. पण पत्र घेतांना तिथं उभं राहून इतर लोक लढाईविषयीं काय बोलतात तें तो लक्षपूर्वक ऐकून घेई. आणि मग रात्रीं सर्व गुलामांना महत्त्वाच्या लढाईच्या बातम्या ऐकायला मिळत. माझी आई, मी, माझा भाऊ एकत्र जेवायला धीं बसलोंच नाहीं. आणि आम्हाला पुरेसं अन्न तरी कुठं मिळत होतं ? कधीं अर्धा भाकरीचा तुकडा, तर कधीं अर्धा कप दूध आणि असेच कांहीं तरी पदार्थ. आमचे दिवस फार हालांत जात होते. पुढें मी मालकाच्या घरीं कामाला गेलों. मंडळी जेवणाला बसली कीं माशा वारायचं काम माझ्याकडे असे. जेवणांत चांगले गोड पदार्थ, केक वगैरे वस्तू असत. माझ्या तोंडाला अशा वेळीं फार पाणी सुटे. पण त्याचा

म. ग्रं. सं. ठाणे.

कांहीं उपयोग नव्हता. मग मी मनाशीं बेत केला कीं मी मोठा झालों, मला पैसे मिळाले, कीं असे केक घेऊन खायचे.

(४)

पहिल्याप्रथम मी बूट घातले ते फारच भयंकर होते. त्या बुटांना लाकडाच्या खोटा होत्या आणि वरचं चामडं कठीण होतं. चालतांना त्याचा खटावऽ खटावऽऽ असा जोरानें आवाज होई. तीच गत कपडयांची. आमचे कपडे सुद्धां निवडण्याची आम्हाला मोकळीक नव्हती. अंगांत सदरा घातला कीं अंगाला टाचण्या टोचल्यासारखं होई. इतका तो खरखरीत असे. मला रडूं येई. मग माझा मोठा भाऊ ज सदरा घाली आणि थोड्या दिवसांनीं जुना झाला कीं मग मला देई.

पण एवढे हाल होत असत तरी गुलाम आपल्या मालकाशीं फार सचोटीनें वागत. गुलामगिरी त्यांना आवडत नव्हती. पण आपल्या मालकांना त्यांनीं कधींच फसविलं नाहीं. आमच्या मालकांचीं मुलं मुली फार आळशी होतीं. त्यांचीं सर्व कामं आम्ही गुलामच करीत असूं. हातांनीं काम करायचं म्हणजे त्यांना लाज वाटायची. पण आमची गोष्ट निराळी होती. मेहनत केली नसती तर आम्हाला खायला कोणी दिलं असत ? त्यामुळं सर्व तऱ्हेचीं कामं करण्याची आम्हाला संवय लागली. एकच गोष्ट आमच्याजवळ नव्हती. आणि ती म्हणजे शिक्षण.

पुढें आम्हीं स्वतंत्र झाल्यावर, आम्हाला शिक्षण नव्हतं तरी आमच्या काम करण्याच्या संवयीचा फार फायदा झाला. आमच्यापैकीं कांहींना लहानसहान उद्योगधंद्यांचीही माहिती होती. मेहनत करून पोट भरण्यांत लाज कां वाटावी ?

तीनचार वर्षांनीं लढाई संपली. आम्ही स्वतंत्र झालों. तो दिवस किती आनंदाचा होता हें कसं सांगावं तेंच कळत नाहीं. किती दिवस आम्ही ह्या दिवसाची आतुरतेनें वाट पाहात होतों. सर्व गुलामांना ही बातमी कळली. गावांतले सारे गुलाम आनंदानें एकमेकांबरोबर बोलत होते. मुलं मुली स्वातंत्र्याचीं गाणीं गात होतीं.

संध्याकाळीं आम्ही सारे गुलाम एकत्र जमलों. आमच्या मालकांचे चेहेरे उदास झाले होते. थोड्या वेळानें एक सरकारी अधिकारी आला आणि त्यानें खिशांतून एक लांब कागद काढून वाचला. आमच्या स्वातंत्र्याचा तो जाहीरनामा होता. माझी आई, भाऊ आणि बहीण माझ्या बाजूलाच उभीं होतीं. आई झटकन् गुडघे टेकून खालीं बसली. आणि आकाशाकडे डोळे लावून तिनें देवाचे आभार मानले. तिच्या डोळ्यांतून सारखे अश्रु वाहात होते. पण ते आनंदाचे होते.

मात्र हा आनंदाचा भर ओसरल्यावर एक नवीन प्रश्न सर्वांच्या पुढें आला. आम्ही स्वतंत्र झालों खरे पण पुढें काय करायचं

आमचीं घरंदारं नव्हतीं. आमच्याजवळ पैसे नव्हते. आमचं म्हणण्यासारखं आमच्याजवळ कांहींच नव्हतं. कांहीं गुलाम सत्तर ऐंशीं वर्षांचे होते. गुलामगिरींत त्यांचा सारा जन्म गेला होता. ते नवीन जागीं जाऊन कसलं काम करणार लहान मुलांच्या कपड्यांना, शिक्षणाला पैसे कुठून आणायचे ? आणि हे प्रश्न पुढं आल्यावर गुलामगिरीच चांगली होती असं कांहींना वाटूं लागलं.

(५)

स्वातंत्र्याची पहिली खूण म्हणून आम्ही आमचीं नांवं बदलण्याचं ठरविलं. तसंच शेतावर काम करण्याऐवजीं दुसऱ्या गांवीं जाऊन राहण्याचं ठरलं. गांव सोडतांना आम्हांला फार वाईट वाटलं. पण त्याला इलाज नव्हता. पश्चिम व्हर्जीनियांत आम्हीं जायला निघालों. एवढा लांबचा प्रवास आम्हीं कधींच केला नव्हता. शेंकडों मैलांचं अंतर कापायचं होतं. एका गाडींत सामान भरून आम्ही निघालों. पण बहुतेक प्रवास आम्हीं पायींच केला. किती दिवस आम्हीं चालत होतों ! आई उवड्यावर जेवण करायची. रात्रीं तिथेंच झोपायचं आणि सकाळीं परत प्रवास सुरू करायचा, असा आमचा कार्यक्रम होता. शेवटीं एकदांचे आम्हीं आमच्या मुक्कामाला पोंचलों.

त्या वेळीं मुख्य धंदा मिठाचा होता. मला मिठाच्या खाणींत नोकरी मिळाली. आम्हीं आता ज्या नवीन गांवीं राहायला आलों त्याचं नांव मॅलडेन होतं.

पूर्वीच्या अमच्या घरापेक्षां हें मॅलडेनमधलं घर फार गैर-सोईचं होतं. शुद्ध मोकळी हवा नांवाला सुद्धां मिळत नव्हती. कारण आजूबाजूला पुष्कळ घरं होतीं. आमचे शेजारी फार अडाणी आणि गरीब होते. नेहमीं ते दारू पिऊन दंगा करायचे.

माझा भाऊ जॉन देखील कारखान्यांत काम करायचा. सकाळीं चारला कामाला सुरुवात होई. इथें कारखान्यांत माझ्या शिक्षणाला सुरुवात झाली असं म्हणायला हरकत नाहीं. कारण प्रत्येक माणूस मिठाचं पोतं उचलायचा. त्याच्या पाठीवर "दोन, पांच, सात" असे निरनिराळे आंकडे लिहिलेले असत. अशा तऱ्हेनें प्रथम मीं आंकडे ओळखायला शिकलों. हळूहळू मी आंकडे लिहिण्याचा प्रयत्न करूं लागलों. लिहिण्यावाचण्याची आवड मला मनापासून होती, हें मी पहिल्यानंच सांगितलं आहे. इथं मॅलडेनला आल्यावर ती आवड वाढूं लागली. एक दिवस आईजवळ मी हट्ट धरला कीं मला पुस्तक पाहिजे. कुठून कोण जाणे, पण तिनं मला एक अंकलिपि आणून दिली. मला फार फार आनंद झाला. एकटाच कुठें तरी बसून मी वाचायचा "अ.... ब...क—" पण हें उपयोगाचं नव्हतं. कोणी तरी मला शिकवणारा पाहिजे होता. आमच्या निग्रो लोकांपैकीं तिथं कुणीच नव्हता. आणि गोऱ्या लोकांजवळ जायला मला भीति वाटे. माझी आईदेखील माझ्याबरोबर वाचण्याचा प्रयत्न करी. तिला कुठें वाचतां येत होतं? पण आपल्या मुलांनीं शिकून मोठं व्हावं असं तिला मनापासून वाटत असे. माझ्या आईनं एक मोठा धडा मला शिकविला आणि तो हा कीं "निराश न होतां चिकाटीनं काम करावं!"

म.ग्रं.र. ठाणे.

(६)

वाचायला यावं म्हणून आम्हीं धडपड चालविली होती. सुदैवानें त्याच वेळीं गांवांत एक निग्रो मुलगा आला. त्याला लिहितां वाचतां येत होतं. दररोज संध्याकाळीं आम्हीं सगळे गुलाम एकत्र जमत असूं व तो मुलगा आम्हाला वर्तमानपत्र



वाचून दाखवी. हळूहळू निग्रो मुलांकरितां शाळा उघडावी अशी सूचना आली. लोकांना ती मनापासून आवडली. पण अडचण होती शिक्षकाची. त्या नवीन निग्रो मुलाला शिक्षक नेमावं असं कांहीं लोकाचं मत होतं. पण तो फार लहान होता. नशीबानें त्याच वेळीं एक सैन्यांतला सुशिक्षित निग्रो शिपाई आमच्या गांवीं आला. त्याला शाळेचा मास्तर नेमण्यांत आलं. प्रत्येक घरांतून पैसे जमवून त्याला पगार द्यायचा. आज एका घरीं तर उद्यां दुसऱ्या घरीं अशी वाराप्रमाणें त्याच्या जेवण्याची व्यवस्था आम्हीं केली. अशा तऱ्हेनें आम्हां निग्रो मुलांकरितां शाळा सुरू झाली. मास्तर ज्या दिवशीं माझ्या घरीं जेवायला यायचे त्या दिवशीं मला फार आनंद व्हायचा. अभिमानानें माझी छाती वर यायची. मोठ्या अधीर मनानें परत त्या दिवसाची मी वाट पाहात बसें. गांवांतला प्रत्येक मनुष्य शाळेंत जाऊं लागला. लहान मुलांची गोष्ट तर सोडाच. पण म्हातारेकोतारेही शाळेंत येऊं लागले. म्हाताऱ्या लोकांची इच्छा होती कीं मरण्यापूर्वी आपल्याला 'बायबल[१]' वाचतां आलं पाहिजे आणि त्यासाठींच ते एवढ्या उत्साहानें शाळेंत येत होते. लवकरच लोकांचा उत्साह एवढा वाढला कीं रात्रीचे आणि रविवारीं वर्ग भरूं लागले. कितीतरी लोकांना परत जावं लागे. कारण शाळेंत जागाच नव्हती. निराश होऊन हे लोक घरीं परत जात. माझी पण स्वतःची गत तीच होती. मी मिठाच्या खाणींत कामाला असल्यामुळें मला शाळेंत जातां येईना. बरं, नोकरी सोडावी तर

(१) धर्मग्रंथ.

आमची गरिबीची स्थिति. कामावरून मी परत येई तो अगदीं थकून भागून. त्यामुळं रात्रीच्या शाळेंत जाणं शक्य नव्हतं. पण शाळेंत जाण्याची मला एवढी तीव्र इच्छा होती कीं मी रात्रीच्या शाळेंत जाऊं लागलों. दिवसा आनंदानें नाचत बागडत शाळेला जाणारीं मुलं मुली मला दिसत. त्यांना पाहून मला त्यांचा हेवा वाटे. कारण मलाही दिवसाच्या शाळेंत जायचं होतं. धीर धरला आणि मनापासूनची खरी इच्छा असली कीं यश मिळतंच. मी दिवसाच्या शाळेंत जाऊं लागलों. पण माझ्या बालमित्रानो, त्यासाठीं मला फार हाल सोसावे लागले. सकाळीं चारला उठून मी कामावर जायचा तो नऊ वाजेपर्यंत. धांवत धांवत मी शाळेंत यायचा, आणि दुपारीं शाळा सुटली कीं परत मिठाच्या कारखान्यांत कामावर जायचा. मला फार त्रास होई. पण त्याची पर्वा मी केली नाहीं. मला शिकायचं होतं. त्यांतच मला मन सोक्त आनंद मिळे.

## (७)

मी शाळेंत धांवत धांवत जायचा खरा. पण त्यापूर्वीच शाळा सुरू झालेली असायची. इतकी धडपड करून शाळेंत वेळेवर जायला मिळत नाहीं याचं मला फार वाईट वाटूं लागलं. पण मला एक युक्ति सुचली. कदाचित् तुम्हीं मला दोष द्याल. तरी सांगतोंच ती तुम्हाला. कारण शाळेंत वेळेवर जायला मिळावं हाच हेतु त्या युक्तीमागं होता. आमच्या कारखान्यांत एक मोठं घड्याळ

भिंतीवर लावलेलं असे. साडेआठचा सुमार झाला कीं मी हळूच घड्याळाचे काटे पुढें सरकवून शाळेंत धूम ठोकायचा. पण ही युक्ति फार दिवस चालली नाहीं. कारण मालकाला घड्याळांत होणारा फरक कळून आला आणि त्यानें घड्याळ बिघडलं असं समजून भिंतीवरून काढून टाकलं. माझ्याबरोबर इतर मुलं शाळेंत यायचीं, त्यांचे कपडे छान असायचे, आणि त्यांच्या डोक्यावर 'हॅट' असायच्या. त्यामुळें मला मनांतून लाज वाटायची. आईला मी एक दिवस म्हटलं—" आई, मला हॅट पाहिजे." पण हॅट घेणं आम्हाला शक्य नव्हतं. कारण आमची स्थिति फार गरीबीची होती. माझी आई फार विचारी बाई होती. एक दिवस तिनें कुठून तरी दोन चांगलेसे कापडाचे तुकडे आणले आणि मला एक छानशी टोपी शिवली. पुढें मी निरनिराळ्या तऱ्हेच्या टोप्या वापरल्या. पण माझ्या आईनें शिवलेली ती टोपी अजूनही मी विसरलों नाहीं. आतां ती आठवण झाली कीं, माझ्या आईच्या प्रेमळपणाविषयीं मला कौतुक वाटतं आणि डोळ्यांत आनंदाचे अ ू येतात. शाळेंत जाण्याच्या आधीं माझं नांव बुकर होतं. पण शाळेंत सबंध नांवाची जरूर होती. प्रत्येक मुलाला मास्तर नांव विचारीत होते. शेवटीं माझ्यावर पाळी आली. मी चटकन् उभा राहिलों आणि सांगितलं—" माझं नांव बुकर वाशिंग्टन—! "

कांहीं महिने मिठाच्या खाणींत काम केल्यावर मी कोळशाच्या खाणींत नोकरी धरली. खाणींत काम करणारे मजूर फार घाणेरडे

असायचे. सगळं अंग काळं व्हायचं. शिवाय घरापासून ही खाण फार दूर होती. आंत काम करायला गेल्यावर प्रकाश मुळींच मिळत नसे. सगळीकडे अंधार. अंधारकोठडी म्हटलीत तरी हरकत नाहीं. पण काम करतांना मला भीति वाटायची. माझ्याजवळचा दिवा नेहमीं विझायचा. शिवाय कांहीं कांहीं वेळां दगड पडून माणसांचा चुरा होऊन जाई. माझ्या मनांत नेहमीं येई, "माझ्या अंगावर दगड कोसळून मी मरणार तर नाहीं ना ?" आणि हा विचार मनांत आला कीं भीतीनं माझं अंग कांपूं लागे. दुसरीं लहान लहान मुलंही खाणींत काम करायला येत. त्यांचा बहुतेक वेळ इथेंच काम करण्यांत जाई. जन्मांत कधीं त्यांना अक्षरओळख होण्याची आशा नव्हती.

## (८)

एक दिवस नेहमींप्रमाणें खाणींत मी काम करीत होतों. बाजूला कोणी तरी बोलत होतं. माझं लक्ष तिथं गेलं आणि मी त्या माणसांजवळ गेलों. माझ्या खाणींतलेच ते मजूर होते. व्हर्जीनियांत एक मोठं कॉलेज उघडलं होतं. त्याच्याविषयीं ते बोलत होते. त्यांचं भाषण मी जास्त लक्षपूर्वक ऐकूं लागलों. कारण तें कॉलेज आम्हां निग्रो लोकांकरितां उघडलं होतं. ज्यांना पैसे देऊन शिकतां येत नसेल त्यानीं तिथं कांहीं काम करून शाळेची फी भरावी अशी सवलतही होती. हें सर्व ऐकून मला फार आनंद

झाला. मी विचार करूं लागलों. " ह्या शाळेंत आपल्याला कसं-बरं जातां येईल? कोणती युक्ति करावी!" पण मध्येंच एक बदल झाला. माझ्या मालकाच्या घरीं माझी बदली झाली. त्याची बायको म्हणे फार रागीट बाई होती. खाणींतला कुणीही त्याच्या-कडे कामाला राहायला कबूल होईना. शेवटीं माझी नेमणूक झाली. पहिल्या दिवशीं मला फार भीति वाटत होती. पण मनाशीं मी ठरविलं होतं कीं, काम चोख करायचं, प्रामाणिकपणानं वागायचं! आणि त्याप्रमाणें मी कामाला सुरुवातही केली. माझं काम मालकाच्या बायकोला आवडूं लागलं. चुकूनही कधीं ती माझ्यावर रागावली नाहीं. इतकंच काय पण मधला वेळ काढून तिनं मला शाळेंतही जायला परवानगी दिली. इथं मीं आनंदांत होतों. मला कामाचा त्रासही पडत नव्हता. तरीही व्हर्जीनियां-तल्या त्या मोठ्या शाळेबद्दल माझ्या मनांत नेहमीं विचार यायचे. दिवसांतून दहादां तरी मला त्या शाळेची आठवण घडायची. त्या शाळेचं नांव होतं, हॅम्प्टन–संस्था!

हॅम्प्टन संस्थेंत जायला माझं मन सारखं तळमळत होतं. काम करतांना कल्पनेनं मी त्या शाळेचं चित्र माझ्या डोळ्यांसमोर आणीत असें. शेवटीं मालकाच्या घरची नोकरी मी सोडली आणि त्या मोठ्या शाळेंत जाण्याचं नक्की ठरविलं. माझा भाऊ जॉन खाणींत काम करीत होता, त्यानं मला पुष्कळ मदत केली. पण प्रवासापुरते पैसे कांहीं मिळेनात. पण पैशाचीही पर्वा न

करतां माझ्याजवळ जेवढे पैसे होते तेवढे घेऊन मी हॅम्प्टनला निघालों. आमच्या निग्रो लोकांपैकीं बाहेर कॉलेजमध्यें शिकायला जाणारा पहिला मुलगा मीच होतों. कांहीं लोकांनीं जातेवेळेस माझ्या हातांत आपापल्या शक्तीप्रमाणें मदत म्हणून मला पैसे दिले. अपुरे पैसे, फाटके तुटके कपडे, अशा अर्धवट तयारीनें मी हॅम्प्टनला जायला निघालों. त्या वेळीं मला फार दुःख झालं. माझी प्रेमळ आई आजारी होती. तिला सोडून जातांना मला फार वाईट वाटलं. मनांत विचार आला, 'आईची माझी परत भेट होईल ना?' पण तो वेडा विचार बाजूला सारून मी वाट चालूं लागलों.

## (९)

आमच्या गांवापासून हॅम्प्टन पांचशें मैल लांब होतं. मध्येंच एखाद्या गाडीवाल्याला विनंति करून मी फुकटचा प्रवास करीत असें. पण नेहमीं कसा फुकट प्रवास करायला मिळणार? त्यांत मी निग्रो होतों. काळ्या लोकांचा गोरे किती द्वेष करतात त्याचं एक उदाहरण सांगतों. एक दिवस संध्याकाळीं, एका हॉटेला-जवळ मी आलों. माझ्या खिशांत एक दमडीही नव्हती. त्यांत थंडीचे दिवस. हॉटेलमध्यें इतर गोरे लोक होते. मी त्या मालकाला म्हटलं, "मला राहायला जागा पाहिजे." पण माझ्या-जवळ पैसे आहेत कीं नाहींत हें न विचारतांच त्यानें मला निग्रो

म्हणून हाकून लावलं. त्या वेळीं पहिल्याप्रथमच माझ्या डोक्यांत प्रकाश पडला कीं काळ्या लोकांना हे गोरे लोक कमी लेखतात. ती सबंध रात्र मी थंडींत कुडकुडत, इथें तिथें भटकत घालविली. पण मला कुठेंही आसरा मिळाला नाहीं. असे हालांत दिवस काढून मी चारशें मैलांच्यावर प्रवास केला. ‘हॅमूप्टन संस्था’ आतां अवघी ऐशीं नव्वद मैलांवर आली होती. पण प्रवासांत काढलेल्या हालानं मी उदास झालों होतों. धुळीनं अंग मळलं होतं. कपडे फाटले होते. आणि जीव तर भुकेनं व्याकूळ झाला होता. पण करणार काय? रस्त्यांतून मी हिंडूं लागलों. दुकानांत खाण्याचे निरनिराळे पदार्थ दिसायचे. माझ्या तोंडाला पाणी सुटायचं. पण त्याचा कांहीं उपयोग नव्हता. कारण माझ्याजवळ पैसे कुठं होते? कांहीं घरांत जाऊन मी काकुळतीनं म्हणावं, “ अहो-मी गरीब मुलगा आहें, हॅम्प्टनला कॉलेजांत चाललों आहें—झोंपण्यापुरती जागा द्या. ” पण साऱ्या लोकांना पैसे पाहिजे होते. कुणालाच माझी दया आली नाहीं. कारण मी ‘ काळा आदमी ’ होतों. रात्रीं फिरतांना, एके ठिकाणीं रस्त्याच्या बाजूला एक भोक होतं. मी थोडा वेळ उभा राहिलों, आणि चटकन् आंत गेलों आणि डोळे मिटले. माणसांच्या पावलांचा आणि गाड्यांचा आवाज मला आंत ऐकूं येत होता. सकाळीं मी उठलों तों बाजूला एक मोठी बोट उभी होती. हमाल लोक सामान उतरवीत होते. मी सहज कप्तानाजवळ गेलों आणि त्याला माझी परिस्थिति समजावून सांगितली. त्यानें



लगेच मला काम दिलं. दुपारीं मजुरीचे पैसे घेऊन मी पोटभर जेवलों. ती बोट बंदरांत वीस बावीस दिवस होती आणि पुष्कळसा माल उतरावयाचा होता. बरेच दिवस मी बोटीवर हमालाचं काम केलं. अखेरीस जेवणाचा खर्च जाऊन ाझ्याजवळ थोडेसे पैसे जमले. मग अधिक वेळ न घालवितां मी हॅम्प्टनला जाण्याचा

विचार केला. काम दिल्याबद्दल मी त्या कप्तानाचे आभार मानले. आणि माझी जुनीपुराणी कपड्याची बॅग घेऊन आनंदानें झपझप पावलें उचलूं लागलों.

## (१०)

अखेर प्रवास संपला आणि ' हॅम्प्टन संस्थे'ची इमारत मला दिसली. त्या वेळीं मला किती आनंद झाला तें मी तुम्हांला कसं सांगणार ! प्रवासांतलीं सारीं दुःखें, सारे कष्ट मी एकदम विसरलों. आणि किती तरी वेळ इमारतीकडेच पाहात राहिलों. इथल्या मुख्य बाईचं नांव मॅकी होतं. मी आंत गेलों आणि बाजूला उभा राहिलों. इतर मुलांपेक्षां माझा अवतार फार निराळा होता. किती तरी दिवस माझ्या अंगाला पाणी लागलं नव्हतं. पुष्कळ वेळ मी गुपचूप उभा राहिलों. बाई दुसऱ्या मुलांच्या नांवाची नोंद करुन घेत होत्या. शेवटीं त्यांचं माझ्याकडे लक्ष गेलं, आणि त्यांनीं मला सांगितलं, " बाजूची खोली स्वच्छ करायची आहे." मी झटकन् एक फडकं घेतलं. आणि खोलींत गेलों. मिठाच्या खाणींत असतांना त्या मालकाच्या घरीं मी हें काम करीतच असें. थोड्या वेळानें मॅकीबाई आल्या आणि त्यानीं खोली पाहिली. त्याना माझं काम पसंत पडलं. त्या दिवसापासून मी तिथें नोकर म्हणून राहिलों. एका अर्थी तें चांगलंच झालं, नाहीं तर माझ्या जेवणाच्या पैशाचा प्रश्न सुटला नसता.

पहाटे उठून मला काम करावं लागे तें रात्र पडेपर्यंत. पण कुरकूर करून कसं चालणार? माझं काम मी मोठ्या प्रामाणिकपणें करीत होतों. अभ्यासही चालूच होता. माझा प्रामाणिकपणा आणि काम करण्याची चिकाटी पाहून मॅकीबाईंची माझ्यावर फार मर्जी बसली आणि मला पाहिजे ती मदत त्या देऊं लागल्या. त्यांच्या प्रेमळपणामुळें आणि मदतीमुळेंच मी मन लावून मोठ्या उत्साहानें माझ्या अभ्यासांत प्रगति करूं लागलों. सुदैवानें मला उत्तेजन देणारे दुसरे एक गृहस्थ भेटले. त्यांचं नांव जनरल आर्मस्ट्रांग. स्वभावानें हे फार प्रेमळ होते. मुलांनीं स्वच्छ कपडे घालावे, दररोज आंघोळ करावी इत्यादि गोष्टींवर त्यांचं फार लक्ष असे. त्यांची माझी ओळख झाली त्यामुळेंच हॅम्प्टनला मला शिक्षण पुरं करतां आलं. माझ्याजवळ पुस्तकं नव्हतीं. कपडे नव्हते आणि कॉलेजची वर्षाची फी द्यायला पैसेही नव्हते. पण माझ्या ह्या सर्व अडचणी जनरल आर्मस्ट्रांगनीं दूर केल्या. कॉलेजमध्यें आणखी दुसरे लोकही शिकायला होते. माझ्यासारखे वयानें लहान नव्हे; चांगले चाळीस पन्नास वर्षांचे! कुणाला बायकामुलं होतीं, कांहींना बहीणभावंडं होतीं. गरिबीची परिस्थिति. पण त्याचा शिकण्याचा उत्साह एवढा दांडगा होता कीं त्यापुढें त्यांना इतर सर्व गोष्टी महत्त्वाच्या वाटत नव्हत्या. कांहीं बायकाही शिकायला होत्या. आम्हाला शिकविणारे शिक्षक फार चांगले होते. पैशाचा लोभ न धरतां आम्हा निग्रो लोकांना जास्त ज्ञान कसं देतां येईल, यासाठीं ते फार

परिश्रम घेत. ह्या शिक्षकांची आतां मला आठवण झाली कीं माझं हृदय आनंदानं भरून येतं आणि त्यांना प्रणाम करण्याकरितां माझं माथं नकळत खालीं वाकतं.

(११)

कॉलेजचं पहिलं वर्ष संपून रजा पडली. सारीं मुलं आपापल्या घरीं गेलीं. पण मला माझ्या घरीं जातां येईना. कारण माझ्या जवळ पैसे नव्हते. मग मला एक युक्ति सुचली. माझ्याजवळ एक गरम कोट होता. तो विकायचं ठरविलं मी. दोन तीन दिवसांनीं एक निग्रो मनुष्य तो विकत घ्यायला आला. मनांतून मला फार आनंद झाला. पण तो क्षणभरच टिकला. कारण तो म्हणाला, " कोट मला पसंत आहे.–पण सगळे पैसे मला आज देतां येणार नाहींत. " माझ्या आनंदावर विरजण पडलं. मी निराश झालों. आणि गांवाला जायचा बेत करून नोकरी शोधूं लागलों. कॉलेजचे मला थोडेसे पैसे द्यायचे होते आणि ते दिल्यावांचून कॉलेजांत जायला मला लाज वाटूं लागली. अखेर मला एका खाणावळींत नोकरी मिळाली पगार फार कमी होता. पण मी निराश न होण्याचं ठरविलं होतं. एक दिवस मला टेबलाखालीं तीस रुपयांची नोट सांपडली. मला आनंद झाला आणि मालकांना ती मी दाखविली. पण मालक पक्का लबाड माणूस. तो म्हणाला, "ज्याअर्थीं ती इथं सांपडली आहे त्याअर्थीं ती माझीच आहे. " मला फार दुःख झालं. पण समाधानही

वाटलं. " दुसऱ्याचे पैसे आपल्याला काय करायचे! बिकट परिस्थितीशीं मी निकरानें झगडायचं ठरविलं. कॉलेज सुरू झाल्यावर मी माझी परिस्थिति मुख्य अधिकाऱ्यांना सांगितली. त्यांनीं मला परत कॉलेजमध्यें यायला परवानगी दिली आणि राहिलेले पैसे माझ्या सवडीनं परत करायला सांगितलं. मी अभ्यास आणि शाळेंत नोकराचं काम करूं लागलों. आमचे सर्वच शिक्षक मोठ्या प्रेमळ मनाचे होते. त्यानीं एक मोठा धडा आम्हाला शिकविला. आणि माझ्या पुढच्या सबंध आयुष्यांत मी तो डोळ्यांसमोर ठेवला, तो धडा म्हणजे—" लोकांच्या कल्याणाकरितां जो नेहमीं झगडत असतो, तोच खरा सुखी मनुष्य होय ! "

कॉलेजचं दुसर वर्ष संपलं. माझ्याजवळ थोडेसे पैसे होते आणि माझ्या भावानं मला पैसे पाठविले होते. सुटी पडल्याबरोबर मी गांवीं निघालों. मला पाहिल्याबरोबर माझ्या आईला आणि जॉनला फार फार आनंद झाला. गांवांतील सारे लोक माझ्या भेटीला येऊं लागले. दुसऱ्या दिवसापासून प्रत्येक घरून मला जेवणाचं बोलावणं येऊं लागलं. त्य सर्वांना हॅमप्टनला दोन वर्षं मी कशीं घालविलीं तें मला सांगावं लागे. मुलं आणि म्हातारीं माणसं मोठ्या कौतुकानं माझं बोलणं ऐकत असत. माझ्याबद्दल ह्या साऱ्या मंडळींना फार अभिमान वाटूं लागला. पुढें मी नोकरी शोधूं लागलों. कारण परत प्रवास करायला माझ्याजवळ पैसे होते कुठें? एक दिवस दुसऱ्या एका

गांवांत नोकरीसाठीं मी गेलों. येतांना रात्र झाली, तेव्हां मध्येंच एका रिकाम्या घरांत मी झोंपलों. मध्यरात्रीच्या सुमारास जॉन धांवत धांवत आला आणि त्यानं मला जागं केलं. मी घाबरून उठलों तेव्हां रडकं तोंड करून तो म्हणाला--"बुकर --आपली आई आपल्याला सोडून गेली रे....!"

आईच्या निधनाची ही बातमी ऐकून मला मोठा धक्का बसला. माझी आई नेहमीं अजारी असे. आमच्यासाठीं तिनें किती श्रम घेतले होते! तिची एकच इच्छा होती कीं आपल्या मुलांनी चांगलं शिकून नांवारूपास यावं. लवकरच आमच्या घरांत गोंधळ उडाला. माझी बहीण घराची सर्व व्यवस्था पाही. पण ती लहान असल्यामुळें तिला तें साधेना. जेवणाचे हाल होऊं लागले. केव्हां केव्हां एकवेळच्या जेवणावरच आम्ही राहूं लागलों. मी अगदीं निराश होऊन गेलों होतों. काय करावं तें सुचेना. एवढ्यांत कॉलेजच्या मॅकीबाईचं पत्र आलं कीं, "तावडतोब निघून ये." मी लगेच निघालों. कारण माझ्या फायद्याचच होतं हें. कॉलेज सुरू होण्यापूर्वी सर्व खोल्या स्वच्छ करायच्या होत्या. सामानाची मांडणी करायची होती. ह्या कामांत मॅकीबाईना मी मदत केली. त्यामुळं माझ्या कॉलेजच्या फीचा प्रश्न थोडाबहुत सुटला. मॅकीबाई चांगल्या शिकलेल्या व मोठ्या घराण्यांतल्या होत्या. पण खोल्या स्वच्छ करण्याचं व इतर कामं त्या जेव्हां माझ्याबरोबर करूं लागल्या तेव्हां मला

आश्चर्याचा धक्काच बसला. मला वाटलं ही एवढी मोठी शिकलेली श्रीमंत बाई निग्रो लोकांच्यासाठीं एवढी धडपड कां करतो! हीं असलीं हलकीं कामं करायला हिला लाज कशी वाटत नाहीं? पण माझा तो गैरसमज लवकरच दूर झाला. मॅकीबाईनी आम्हाला एक मोठा धडा शिकवला तो म्हणजे, "कसलेंही काम करण्यांत कमीपणा नाहीं. तें प्रामाणिकपणें मात्र करावं. तसंच आपलं जीवन हें दुसऱ्यांच्या सेवेसाठीं आहे, हें आपण कधींही विसरतां कामा नये." शेवटच्या वर्षीं मी कसून अभ्यास केला आणि वरच्या वर्गांत आलों. माझं हॅमप्टन कॉलेजमधलं शिक्षण आतां पुरं झालं होतं. नंतर मी एका हॉटेलांत नोकरी धरली आणि प्रवासापुरते पैसे जमले तेव्हां घरीं जायला निघालों. गावीं आल्यावर मला फार आनंद झाला. लवकरच गावांतल्या निग्रो मुलांना मी शिकवूं लागलों. सकाळीं आठला सुरुवात व्हायची ती रात्रीं नऊ दहा वाजेपर्यंत. नुसतं लिहायला वाचायलाच नव्हे तर कपडे स्वच्छ कां घालावे, दांत स्वच्छ कां घासावे, दररोज आंघोळ करावी ह्या गोष्टीही मी मुलांना शिकवीत असें. शाळेचे वर्ग पहिल्या दिवसापासून चिक्कार भरेल. पन्नास साठ वर्षांचीं म्हातारीं माणसंही शिकायला यायचीं. त्यांचा तो उत्साह पाहून मला त्यांच्याविषयीं फार आदर वाटे. रविवारी शाळेचे वर्ग चालूच होते. गावांत मी एक लहानसं वाचनालय उघडलं. त्याशिवाय ज्या मुलांना शिकायची

फार इच्छा होती त्यांना मी फुकट शिकवीत असें. पैशाचा मला लोभ नव्हता. माझ्या अशिक्षित बांधवांना ज्ञान द्यायचं, एवढं एकच ध्येय माझ्यासमोर होतं. त्यासाठीं मी जिवापाड श्रम करीत होतों. हॅम्प्टनला मी जो एक मोठा धडा शिकलों तो माझ्या डोळ्यांसमोर नेहमीं होता.

"आपलं जीवन सेवेसाठीं आहे. दुसऱ्यांच्या कल्याणा-करितां जो झगडतो तोच खरा सुखी मनुष्य!"

माझ्या दलित बांधवांना ज्ञान देतांना मला फार आनंद मिळायचा.

---

अ. क्र. २५०३
बा. वा.
IRBK-0102503
IRBK-0102503

म. ग्रं.

# बालवाचकांकरितां आमचीं पुस्तकें

१ आई ( माधव कामत ) ०—[illegible]
२ विक्रमाची साडेसाती ( तारावाई मोडक ) ०—[illegible]
३ जादूचा घोडा ( ,, ) ०—[illegible]
४ सवाई विक्रम ( ,, ) ०—[illegible]
५ गारांचा पाऊस ( शं. रा. देवळे ) ०—[illegible]
६ गंपूदादाचा लाकडदांड्या ( तारावाई मोडक ) ०—[illegible]
७ वानरांची सर्कस (वसंत वैद्य ) ०—४—
८ प्रवासी गलिव्हर ( दीनानाथ म्हात्रे ) ०—६—
९ तीन पण व इतर गोष्टी ( वैबळकर ) ०—५—०
१० चतुर तुतारीवाला ( वैबळकर ) ०—५—
११ अजित कुमार ( तारावाई जाधव ) ०—४—०
१२ रत्नकंकण ( ,, ) ०—४—०
१३ पालवी ( वसंत वैद्य ) ०—५—०
१४ मजेदार कथा ( यदुनाथ थत्ते ) ०—६—०
१५ नूतन नीतिकथा भा. १ ( गो. वा. पंडितराव ) ०-१०-०
१६ ,, ,, २ ( ,, ) ०-१०-०
१७ हिरवा पक्षी ( दीनानाथ म्हात्रे ) ०—५—०
१८ चिमण्या कळ्या भाग १ ( मालतीवाई दांडेकर ) ०—५—०
१९ चिमण्या कळ्या ,, २ ( ,, ) ०—५—०
२० सुनंदा ( अक्कलकोटकर ) ०—५—०
२१ एका रात्रींत देऊळ ( यदुनाथ थत्ते ) ०—८—०
सुलभ महाभारत भाग १ ते ६ प्रत्येकी ०—८—०

१ कांचनगंगा ( सौ. वाळिंबे ) ०—४—०
२ निळें आकाश ( ,, ) ०—५—०
३ रुपेरी किरण ( ,, ) ०—४—०
४ सात तारका ( ,, ) ०—४—०

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४